सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

**Board of Examinations & Evaluation**
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in

**संदर्भ क्र.:** परीक्षा/छावता/३३४५ **दिनांक :** २४/१०/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था, (स्वायत्त संस्थासह)
प्रस्तुत विद्यापीठ (पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा-नगर हवेली)

**विषय : सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) आणि Trigger-2 (दुसरी कळ) लागू झालेल्या ३०५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत.**

संदर्भ :
१.मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. समिती—२०२६/ प्र.क्र.८२/मदत—२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६
२.मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिंस/शिष्य—२०२६—अवर्षण—परीक्षा शुल्क—२०२६—२७/ई१३२१७१६, दिनांक ३० सप्टेंबर, २०२६
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/३२३५, दिनांक ०१/१०/२०२६.
४.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/३२६३, दिनांक ०८/१०/२०२६.
५.मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. समिती—/ प्र.क्र.८२/मदत—२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२६
६.या कार्यालयाचे पत्र क्रमांक परीक्षा/छावता/३३१९, दिनांक १५/१०/२०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रानुसार शासन निर्णय व पत्राचे अवलोकन करुन त्यामध्ये नमूद निर्देशांनुसार परीक्षा शुल्काबाबतची आवश्यक ती कार्यवाही व्हावी तसेच संबंधित दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा व इतर शुल्क आकारण्यात येऊ नये. महाविद्यालयांनी असे परीक्षा फॉर्म इनवर्ड करतांना सदर विद्यार्थी दुष्काळग्रस्त असल्याचे मार्क केल्यावर सदर विद्यार्थ्यांची परीक्षा व इतर अनुषांगिक शुल्क शुन्य होईल.

या संदर्भात विद्यापीठाने उपर निर्देष्ठित संदर्भाने वेळोवेळी सर्व महाविद्यालयांना कळवल्यानंतरही काही संलग्न व स्वायत्त महाविद्यालये दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकडे परीक्षा फी ची मागणी करत असल्याच्या तोंडी व लेखी तक्रारी प्राप्त आहेत. सबब, सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शासनाच्या धेय्य—धोरणानुसार व शासन निर्णयांप्रमाणे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना परीक्षा फी आकारु नये, विद्यार्थ्यांकडे काही कागदपत्रांची कमतरता असल्यास त्यासाठी वेळ द्यावा, मात्र परीक्षेपासून वंचित ठेवु नये.

तसेच दुष्काळग्रस्त तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वीच परीक्षा फी व इतर शुल्क भरले आहे, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा व इतर शुल्काची प्रतिपूर्वी करण्यात येणार आहे. यासाठी महाविद्यालयानी examinward.unipune.ac.in या लिंकवरुन तात्काळ माहिती भरावी, म्हणजे कार्यवाही करणे शक्य होईल. अद्यापही बऱ्याच महाविद्यालयांकडुन सदर माहिती अप्राप्त असलेने ही माहीती शासनास पाठवण्यास अडचणी येत आहे, सर्व प्राचार्यांना विंनती करण्यात येते की, आपण कृपया याबाबत आपल्या कार्यालयास सुचना द्याव्यात व सदर माहिती तात्काळ भरण्यास सांगावे, ही विनंती.

कळावे,

आपला,

(डॉ. राजेंद्र तलवारे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :**

१. मा.कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा.प्र—कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
४. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य